जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email-cp.thane.pro@mahapolice.gov.in

'' प्रेस नोट'' **दिनांक : २७/०८/२०२६**

''बस मध्ये प्रवासादरम्यान महिलांच्या हातातील सोन्याची बांगडी चोरणा-या ३ सराईत आरोपीतास अटक करून त्याचेकडुन चोरी केलेले २० लाख ५३ हजार रूपये किमतीचे १३० ग्रॅम वजनाच्या ६ सोन्याच्या बांगडया हस्तगत करून चोरीचे ६ गुन्हे उघडकीस आणले बाबत,''

''गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी''

----------oooo----------

दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी १४:१० वा चे सुमारास फिर्यादी महिला नामे कल्पना शिरीष पाटणकर, वय ६१ वर्षे, राह. दादलानी पार्क, अशोक नगर, बाळकुब, ठाणे. या लुईसवाडी बस स्टॉप ठाणे येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरटयांनी फिर्यादी यांच्या उजव्या हातातील सोन्याची बांगडी चोरी केली बाबत नौपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २२५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे दिनांक २०/०७/२०२६ रोजी दाखल करण्यात आला होता.

नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपासात गुन्हे शाखा घटक १, ठाणे कडुन करण्यात येत असताना गुन्हे शाखा घटक ०१ चे नेमणुकीतील **पोहवा/४१७४ संदिप महाडीक, पोशि/२७५५ अमोल ढावरे** यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासुन त्याआधारे मोठया मेहनतीने यातील आरोपीताबाबत खात्रीलायक माहिती प्राप्त करून नमुद तपास पथक यांनी यातील आरोपीत नामे १) कपील सुरेश तीडंगे, वय ३८ वर्षे, राह संगम गायकवाड यांची खोली, सुभाष वाडी, कृष्ण मंदीर जवळ, वांद्रा पाडा, अंबरनाथ प., ठाणे. २) पोर्णीमा सुरेश तीडंगे उर्फ कल्लु कल्पना वय ३२ वर्षे राह संगम गायकवाड यांची खोली, सुभाष वाडी, कृष्ण मंदीर जवळ, वांद्रा पाडा, अंबरनाथ प., ठाणे. यांस योग्य प्रकारे सापळा रचुन ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयामध्य दिनांक ०३/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली असुन ३) दिपक वतन अभंगे, वय ४८ वर्षे, राह स्वताची खोली, सुभाष वाडी, कृष्ण मंदीर जवळ, वांद्रा पाडा, अंबरनाथ प., ठाणे. यास योग्य प्रकारे सापळा रचुन ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयामध्ये दिनांक २१/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीत याचेकडे पोलीस कस्टडी दरम्यान केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये त्यानी दाखल गुन्हयासह ठाणे पोलीस आयुक्तालयातील नौपाडा, ठाणेनगर,राबोडी पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण ६गुन्हे केले असल्याचे निष्पन्न करून सदर ६ गुन्हयांमध्ये त्यानी चोरी केलेले एकुण २० लाख ५३ हजार रूपये किमतीचे १३० ग्रॅम वजनाच्या ६ सोन्याच्या बांगडया हस्तगत करण्यात आल्या आहेत तसेच सदर आरोपींकडुन अजुन बरेच गुन्हे अघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा घटक १ चे पोलीस उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ करीत आहेत.

उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे

अ.क्र.	पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नंबर व कलम
१	नौपाडा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. २२५/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
२	ठाणेनगर पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. १०२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
३	ठाणेनगर पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. १२७/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
४	ठाणेनगर पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. २१२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
५	ठाणेनगर पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. २४२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
६	राबोडी पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ७८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, मा. पोलीस सह आयुक्त, गुन्हे श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे यांची सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १

चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल शिंदे, पो.निरीक्षक अमोल वालझाडे, म.सहा.पो.निरीक्षक चित्रा चौधरी, पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, श्रे. पो.उप. निरीक्षक दिपक जाधव, पोहवा/अविनाश पाटील, पोहवा/संदिप महाडिक, पोहवा/ व्यंकट धायगोडे, पोहवा/ धनंजय आहेर, पोहवा/ दिपक जाधव, पोहवा/मुकंद आव्हाड, पोहवा/ गणेश बडगुजर, पोहवा/शशिकांत सावंत, पोहवा/मलीका बहीरम, पोहवा/दिपाली जाधव, पोशि/ प्रशांत लवटे, पोशि/ अमोल ढावरे, पोशि/ मयुर लोखंडे, पोशि/ सागर सुरळकर , पो.उप.निरीक्षक सुभाष मोरे, सहा.पो.उप.निरी. दयानंद नाईक, सुनील माने, उज्वला कुबल, पो.हवा/ नागराज सोनकडे, शब्बीर फरास, नंदकुमार पाटील, पो.ना/ निशीकांत पाटील, यांनी केली आहे.